जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस

THANE POLICE COMMISSIONERATE

प्रेस नोट. **दि.०४/०७/२०२६**

'' डोंबिवली एमआयडीसी परिसरातील नाले, गटाराचे बांधकामाचे कामकाज हे कॉन्ट्रॅक्टरने निकृष्ट दर्जाचे केले असल्याबाबत मा.कार्यकारी अंभियंता, एमआयडीसी, डोंबीवली यांचेकडे माहिती अधिकार अर्ज(RTI)टाकुन सदरचा माहिती अधिकार अर्ज (RTI)मागे घेण्याकरीता कॉन्ट्रॅक्टरकडे खंडणीची मागणी करून १५ लाख रूपयाची खंडणीची रक्कम स्विकारताना महिती अधिकार कार्यकर्त्याच्या चौकडीला गुन्हे शाखा,घटक–०३ कल्याण कडुन अटक ''

डोंबिवली एमआयडीसी मध्ये नाले व गटाराचे बांधकाम कॉन्ट्रॅक्टर मे. अजवानी– मेटकॉन जॉईंट व्हेन्चर या कंपनीने डोंबिवली एमआयडीसी मध्ये नाले व गटाराचे बांधकाम हे निकृष्ट दर्जाचे केले असलेबाबत मा. कार्यकारी अभियंता यांचेकडे आरटीआय टाकुन सदरचा आरटीआय अर्ज मागे घेण्याचे बदल्यात मे. अजवानी– मेटकॉन जॉईंट व्हेन्चर या कपंनीचे सुपरवायझर तक्रारदार यांना १५ लाख रूपये खंडणीची वारंवार मागणी करीत असल्याबात इकडील घटकात तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीनंतर दि.०२/०७/२०२६ रोजी मे. अजवानी– मेटकॉन जॉईंट व्हेन्चर या कपंनीचे सुपरवायझर तक्रारदार यांचेकडुन खंडणीची रक्कम स्विकारण्याकरीता **१) दिपेश गौतम लोखंडे, वय ३९ वर्ष, राह. ओमकार अर्पा. ए विंग, ४०३, घनसोली गांव, नवी मुंबई २)राहुल सुधाकर मुकादम, वय ३० वर्ष, राह. मुकादम निवास, रिलायंन्स पेट्रोल पंपामागे, कल्याण भिवंडी रोड, कोनगांव, भिवंडी, जि.ठाणे ३) विशाल गंगाराम जानकर, वय ३१ वर्ष, राह. ३०३, ओम निवास प्लॉट नंबर ०१, सेक्ट–५, करंजाळे, पनवेल, जि. रायगड, ४)नरेश राजेंद्र सुर्यवंशी वय २९ वर्ष, राह. रूम नंबर ३०१, समता नगर, गणपती तलावाच्या बाजुला सेक्टर–१, रबाडे, नवी मुंबई** हे त्यांचे मालकीचे MH43-CM 0262 व MH04-MN 7691 या चारचाकी गाडयातुन पेंढारकर कॉलेज जवळील एका बर्गर शॉपमध्ये आले होते. सदरवेळी गुन्हे शाखा,घटक–०३ कल्याण कडील पोलीस अधिकारी व अमंलदार यांनी सापळा कारवाई रचुन वर नमुद ४ आरोपीत यांना डोंबिवली एमआयडीसी मध्ये नाले व गटाराचे बांधकाम हे निकृष्ट दर्जाचे केले असलेबाबत मे. अजवानी– मेटकॉन जॉईंट व्हेन्चर या कपंनीचे सुपरवायझर तक्रारदार यांचेकडुन **मा.कार्यकारी अभियंता यांचेकडे केलेला आरटीआय अर्ज मागे घेण्याचे बदल्यात खंडणीची मागणी करण्यात आलेली १५ लाख रूपये रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले आहे.**

सदर कारवाईच्या अनुषंगाने मे. अजवानी– मेटकॉन जॉईंट व्हेन्चर या कपंनीचे सुपरवायझर तक्रारदार यांचे फिर्यादीवरून मानपाडा पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ५५५/२०२६ बीएनएस २०२३ चे कलम ३०८(२),३०८(३),(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **सदर कारवाई दरम्यान रोख रक्कम,०५ मोबाईल फोन तसेच दोन चारचाकी वाहने असा एकुण २१,१०,५००/–रू(एकवीस लाख दहा हजार पाचशे रूपये) किमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.** सदर गुन्हयात वर नमुद ०४ आरोपीत यांना अटक करून मा. न्यायालयात हजर केले असता त्यांना मा.कोर्टाने ०५ दिवस पोलीस कोठडी रिमांड मंजुर केली आहे.

याव्दारे ठाणे पोलीसांकडुन नागरिकांना आव्हान करण्यात येते की, सदर आरोपीत यांनी आणखी कोणाकडे खंडणीची मागणी करीत असल्यास पोलीसांना समक्ष भेटुन तक्रार करावी.

प्रस्तुत यशस्वी कामगिरी मा.श्री.आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे शहर, मा. श्री. पंजाबराव उगले, पोलीस सह आयुक्त, (गुन्हे) ठाणे, मा. श्री. अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे ठाणे ,व मा. श्री. शेखर बागडे सहा.पोलीस आयुक्त, (शोध १) गुन्हे शाखा, ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अजित शिंदे, सपोनि/बळवंत भराडे, सपोनि/सर्जेराव पाटील, पोउनि/एस.एम.तावडे खंडणी विरोधी पथक, सपोउपनि/बालाजी शिंदे, पोहवा/१३३५ सुधीर कदम, पोहवा/सचिन कदम, पोकॉ./गुरूनाथ जरग, पोकॉ/ सतिश सोनावणे , पोकॉ/मिथुन राठोड, पोकॉ/५५४८ गोरक्ष शेकडे यांनी केलेली आहे.

———०००———